# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
# Savitribai Phule Pune University
**(Formerly Pune University)**
**Ganeshkhind, Pune – 411007**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११८८/८९
Telephone: 020-25621188/89
ईमेल / Email : affiliation@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
Academic Section (Affiliation Unit)
वेबसाइट/Website: www.unipune.ac.in


## तातडीचे व महत्वाचे

## परिपत्रक क्र. ४७/२०२६

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०८(१)(च) मधील तरतुदीनुसार संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांची संख्या, अर्हता, सेवेच्या अटी व शर्ती तसेच वित्तलब्धी या, विद्यापीठाने व राज्य शासनाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असणे आणि त्या अभ्यास पाठयक्रम, अध्यापन, प्रशिक्षण आणि संशोधन यांच्याकरिता कार्यक्षमतेने योग्य ती तरतूद करण्यास पुरेशा असणे ही संलग्नीकरण तसेच मान्यता यांकरिताची अट असून त्याचे अनुपालन करणे संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांवर बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने परिपत्रक क्र. २२/२०२६, जावक क्र. सीए/१८०, दिनांक १४ फेब्रुवारी, २०२६ अन्वये ज्या संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये नियमित आणि तदर्थ स्वरुपात नियुक्त झालेले आणि विद्यापीठाची मान्यता असलेले एकत्रितपणे किमान ५०% शिक्षक कार्यरत नसतील, अशा संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांना सदर पूर्तता करण्याकरिता दिनांक ३१/०३/२०२६ पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. सदर परिपत्रकास अनुसरून बहुतांश संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी याबाबतची प्रक्रिया सुरू केली असून ती अंतिम टप्प्यात आहे.

सबब, याबाबत प्राप्त आदेशानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, परिपत्रक क्र. २२/२०२६, जावक क्र. सीए/१८०, दिनांक १४ फेब्रुवारी, २०२६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना सदर पूर्तता करण्याकरिता दिनांक १५/०४/२०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे. याची सर्व संबंधितांनी गांभीर्याने नोंद घेऊन याबाबत आवश्यक ती कार्यवाही त्वरीत पूर्ण करावी.

संदर्भ क्र. : सीए/३७५ )
दिनांक : ३१ मार्च, २०२६ )

(प्रदिप कोळी)
उपकुलसचिव
(अतिरिक्त कार्यभार)

प्रति,

१. मा.अध्यक्ष/सचिव, संबंधित संस्था
२. मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ